प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,

कर्जत- ४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसकें/स.सं.सं/मृदशास्त्र/ठेकापध्दतीने काम/२६००/२०२१ दिनांक १७.११.२०२१ 17 NOV 2021

## जाहिर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील मृद व रसायनशास्त्र विभागातील रब्बी २०२१-२२ हंगामामध्ये प्रक्षेत्रावरील प्रायोगीक तसेच प्रयोगशाळेतील पृथ्थकरणाची कामे करावयाची आहेत. उपरोक्त कामांचा अनुभव असलेल्या आणि काम करण्यास इच्छुक असणाऱ्या कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामासाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक ३०/११/२०२१ पुर्वी सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र
कर्जत- ४१०२०१ जि. रायगड

प्रत :

१) विद्यापीठ संकेत स्थळ डा.बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली, जि.रत्नागिरी
२) नोटीस बोर्डः प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड.

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील मृद व रसायनशास्त्र विभागांतर्गत ठेका पद्धतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक**

दिनांक :

प्रति,

**मा. सहयोगी संशोधन संचालक**
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत- ४१०२०१, जि. रायगड

**विषय** : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील मृद व रसायनशास्त्र विभाग येथे प्रक्षेत्रावरील प्रायोगीक तसेच प्रयोगशाळेतील पृथ्थकरणाची कामे ठेका पद्धतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक....

**संदर्भ** : जा.क्र.प्राकृसंके/स.सं.सं/मृदशास्त्र/२६००/२०२१, दि.१७.११.२०२१

वरील संदर्भित जाहीर प्रसिद्धी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील मृद व रसायनशास्त्र विभाग येथे प्रक्षेत्रावरील प्रायोगीक तसेच प्रयोगशाळेतील पृथ्थकरणाची कामे ठेका पद्धतीने करावयाच्या कामाचे दरपत्रकखालील प्रमाणे.

| कामाचे तपशिल | मृद व रसायनशास्त्र विभाग (कालावधीः ०१ डिसेंबर, २०२१ ते ३१ मार्च, २०२२) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | रुपये................../-<br>(अक्षरी ........................................) |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही : ......................................

नाव : ......................................

पत्ता : ......................................

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, मृदशास्त्र विभागाच्या विविध प्रक्षेत्रावरील व प्रयोगशाळेतील करण्यात येणाऱ्या कामांची यादी**

**कालावधी - दि. ०१ डिसेंबर, २०२१ ते ३१ मार्च, २०२२**

१ रब्बी २०२१-२२ या हंगामात पेक्षेत्रावर व शेतकऱ्यांचे शेतावर भात प्रयोग घेण्यासाठी प्लॉटची मशागत करणे व गादीवाफे तयार करुन पेरणी करणे
२ घेण्यात आलेल्या प्रयोगाची लावणी, काढणी आणि झोडणी करणे. वेळेनुसार पिकास खते व पाणी देणे.
३ वनस्पती व बीज यातील नत्र, स्फुरद आणि पालाश यांचे पृथ्थकरण करण्यासाठी मदत करणे.
४ चाळणी केलेली मातीमधून सामु, विदयुत वाहकता, नत्र, स्फुरद आणि पालाश काढण्याकरिता मातीचे वजने घेण्यास मदत करणे.
५ पृथ्थकरण्यासाठी वापरण्यात आलेले प्रयोगशाळेतील काचेची व इतर भांडी धुण्यासाठी मदत करणे.
६ भातपैदास विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत व कृषि संशोधन केंद्र, शिरगाव, जि. रत्नागिरी यांच्याकडून प्राप्त झालेले भात जर्मप्लाझम मधील सुक्ष्मअन्नद्रव्यांचे व जीव रासायनीक गुणधर्म तपासणीसाठी करण्यात येणाऱ्या पृथ्थकरणास मदत करणे
७ पृथ्थकरणासाठी आलेल्या भाताच्या नमुन्यामधील आद्रतेचे (Moisture) प्रमाण तपासण्यासाठी मदत करणे.
८ पृथ्थकरण्यासाठी आलेले भात नमुन्यातील आद्रतेचे (Moisture) कमी करण्यासाठी Oven dry करणे.
९ Oven dry केलेल्या भात नमुन्याचे Huller मशीनवर साल काढण्यासाठी मदत करणे.
१० साल काढणीनंतर मिळालेला तपकिरी तांदळापासून मिलर मशीनवर पांढरा तांदुळ तयार करण्यासाठी मदत करणे.
११ पांढरा तांदळापासून पावडर तयार करून १०० मेश गाळणीतुन चाळून घेणे.
१२ वेगवेगळया गुणधर्माच्या चाचणी करिता तयार करण्यात येणाऱ्या तांदुळाच्या पावडरचे वजन करण्यासाठी मदत करणे.
१३ ऐनवेळी सांगण्यात येणारी सर्व कामे करणे.
१४ प्रयोग लावणीसाठी भात रोपे काढणे, खते देणे व प्रयोगाची लावणी करणे
१५ भात प्रयोगात तण काढणे भेसळ काढणे

सही : ......................

नाव : ......................

# कंत्राटी कामाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे

१) प्रक्षेत्रावरील शेती विषयक कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनूसार नेमून देतील त्याचप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२) कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्णकेलेबाबतच्या दाखला जोडणे आवश्यक आहे.

३) निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४) ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड व बँक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुषंगीक रक्कम संबधीतकामगारांच्या बँक खाती जमा करणे आवश्यक आहे.

5) ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६) प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७) ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपद्धती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

8) ठेक्यातील मजूरांनी किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

9) याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल,२०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०) ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११)ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२) ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

सही : ..................................

नाव : ..................................